**मे. ट्वेंटी वन शुगर्स लि., कसारखेडा रोड, मौ. मळवटी, ता. जि. लातूर, यांच्या मुळ साखर उत्पादन प्रकल्पामध्ये प्रस्तावित विस्तार साखर कारखाना - ४५०० टीसीडी ते ७५०० टीसीडी, सह-विज निर्मीती - १४.५ मे. वॅट ते ४० मे.वॅट आणि नविन १०० किलो लि. प्र.दि. मळीवर आधारित आसवणी या प्रस्तावित प्रकल्पासाठी दि. १८/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. ट्वेंटी वन शुगर्स लि., कसारखेडा रोड, मौ. मळवटी, ता. जि. लातूर, महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त.**

मे. ट्वेंटी वन शुगर्स लि., कसारखेडा रोड, मौ. मळवटी, ता. जि. लातूर महाराष्ट्र यांच्या मुळ साखर उत्पादन प्रकल्पामध्ये प्रस्तावित विस्तार साखर कारखाना - ४५०० टीसीडी ते ७५०० टीसीडी, सह-विज निर्मीती - १४.५ मे. वॅट ते ४० मे.वॅट यांचे विस्तारीकरण आणि नविन प्रस्तावित १०० किलो लि. प्र.दि. मळीवर आधारित आसवणी या प्रस्तावित प्रकल्पासाठी दि. १८/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. ट्वेंटी वन शुगर्स लि., कसारखेडा रोड, मौ. मळवटी, ता. जि. लातूर महाराष्ट्र येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

**१) श्री. जी. श्रीकांत,** अध्यक्ष.
जिल्हाधिकारी लातूर,
जि.लातूर.

**२) श्री. राजेंद्र आ. राजपूत,** सदस्य.
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद.

**३) श्री. व्यं.पां.शेळके,** समन्वयक.
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, लातूर.

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले, सदस्य आणि उपस्थित सहभागी यांची यादी येथे जोडली आहे. श्री. व्यं.पां.शेळके उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, लातूर तथा पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे समन्वयक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोक सुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की मे. ट्वेंटी वन शुगर्स लि., कसारखेडा रोड, मौ. मळवटी, ता. जि. लातूर यांच्या मुळ साखर उत्पादन प्रकल्पामध्ये प्रस्तावित विस्तार साखर कारखाना प्रस्तावित केलेल्या साखर कारखाना - ४५०० टीसीडी ते ७५०० टीसीडी, सह-विज निर्मीती - १४.५ मे. वॅट ते ४० मे.वॅट यांचे विस्तारीकरण आणि नविन प्रस्तावित १०० किलो लि. प्र.दि. मळीवर आधारित आसवणी प्रकल्पासाठी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. नंतर त्यांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (एमओइएफसीसी) यांची अधिसूचना क्र. एस.ओ.१५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ यातील तरतुदी आणि प्रस्तावित प्रकल्पाचा सारांश स्पष्ट करुन प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांचे पर्यावरण विषयक सल्लगार मे. एसडी इंजिनियरिंग सर्विसेस प्रा.लि., औरंगाबाद

(NABLमान्यताप्राप्त) यांच्या मार्फत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासहीत सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ते म.प्र.नि.मंडळाने दि. १४/११/२०१९ रोजीच्या डेली लोकमत टाईम्स (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द होईपर्यंत पर्यावरण विषयक मंजूरी घेण्यासाठी अवलंबविण्यात येणाऱ्या पध्दतीचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की मुळ साखर उत्पादन प्रकल्पामध्ये प्रस्तावित विस्तार साखर कारखाना - ४५०० टीसीडी ते ७५०० टीसीडी, सह-विज निर्मीती - १४.५ मे. वॅट ते ४० मे.वॅट यांचे विस्तारीकरण आणि नविन प्रस्तावित १०० किलो लि. प्र.दि. मळीवर आधारित आसवणी प्रकल्प सदर अधिसूचनेनसुार 'अ' वर्गात मोडतो, ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजूरी लागते. म्हणून सदर प्रकलपासाठी जाहीर लोकसुनवाणी घेणे गरजेचे आहे. त्यांनी पुढे सांगितले की सदर अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आणि इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतील कार्यकारी सारांश यांच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, जिल्हा परिषद, लातूर, तहसील कार्यालय, लातूर, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर, ग्रामपंचायत कार्यालय, मळवटी व म.प्र.नि.मंडळ आणि अन्य संबंधित कार्यालये इ. ठिकाणी लोकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आल्या होत्या आणि सदर प्रकलपाबाबत जर कुणाला काही आक्षेप, शंका, सुचना असतील तर ते त्यांनी नोंदवावे असे लोकांना आवाहन करण्यात आले होते, परंतु आजपर्यंत लेखी सुचना प्राप्त झालेल्या नाहीत, तथापि, **श्री. सुनंदा रेड्डी** आणि **श्री. एच. मधूबाबु, हैद्राबाद** यांच्या कडून काही सल्ले प्राप्त झाले आहेत, त्या त्यांनी जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष आणि प्रकल्प सल्लागार यांच्याकडे सुपूर्द केल्या व त्यांचे उत्तर प्रकल्प सल्लागार देतील असे सांगितले. त्यांनी सांगितले की सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीच्या प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रीकरण केले जाईल इतिवृत्त तयार केले जाईल. आणि पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या कडे पर्यावरण विषयक मंजुरी बाबतच्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

त्यांनी उपस्थित लोकांना विनंती केली की सदर प्रकल्पाविषयी जर कुणाला काही शंका, आक्षेप, सुचना, वैगेरे विचारायचे असतील तर ते त्यांनी सदर प्रकल्पाचे तांत्रिक सादरीकरण पूर्ण झाल्या नंतर आपले नाव व गांवाचे नाव सांगुन विचारण्यात यावे. त्यानंतर त्यांनी जाहीर लोक सुनवणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर प्रल्पाचे तांत्रिक सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण विषद करण्यास विनंती केली.

नंतर प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार, **श्री. नाहुष कवाडकर**, मे. एसडी इंजिनियरिंग सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉइंट सादरीकरण ज्यामध्ये प्रक्ल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना, करण्यात येणाऱ्या उपाय योजना इ.चा समावेश आहे, ते सुरु केले आणि सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाचे नाव. मे. ट्वेंटी वन शुगर्स लि. आहे व त्याचे ठिकाण गट क्र. ७५,७६,७७,७८, इ. कसारखेडा रोड, मौ. मळवटी, ता. जि. लातूर येथे आहे. प्रस्तावित उत्पादन हे साखर, सह-वीज निर्मिती, व मद्यार्क असे असेल आणि हा विस्तारीकरण प्रकल्प आहे व त्यासाठी त्यांनी कारखान्याकडे त्यांची स्वत:ची २३०६७१ चौ.मि. एवढी जागा आहे. त्यांनी सांगितले की प्रकल्पाचे सद्याचे उपादन साखर – ४५०० टीसीडी व सह-वीज निर्मिती १४.५ मे.वॅ. असे आहे, प्रस्तावित विस्तारिकरण उत्पादन हे साखर - ३००० टीसीडी, सह-वीज निर्मिती - २५.५ मे.वॅ. आणि आसवणी – १०० किलो लि. प्र.दि. असे असेल, म्हणजेच एकुण उत्पादन क्षमता ही साखर-७५०० टीसीडी, सहवीज निर्मिती - ४० मे.वॅ.आणि आसवणी - १०० किलो. लि.प्र.दि. अशी असेल. त्यांनी प्रकल्प स्थळाचा नकाशा, जो उपग्रह प्रतिमा व टोपोशीट च्या सहाय्याने तयार केला तो दाखविला.

त्यांनी स्रोत आणि प्रकियेची उपलब्धता या विषयी विषद केले आणि सांगितले की एकुण वीज निर्मिती ही ४० मे.वॅ. असेल, त्यांपैकी सद्याची वीज निर्मिती ही १४.५ मे.वॅ. आहे व २५.५ मे.वॅ. वीज निर्मिती ही प्रस्तावित आहे, कारखाण्यासाठी लागणारी वीज ही प्रस्तावित प्रकल्पामधुन घेतली जाईल उर्वरीत वीज ही एमएमइडीसीएल ला विकली जाईल. औद्योगिक वापरासाठी पाण्याची आवश्यकता ही ६९३ घ.मी.प्र.दि. एवढी असेल व घरगुती वापरासाठी ती ५५ घ.मी.प्र.दि. अशी असेल आणि पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी कारखान्याने मांजरा नदीवरील खुलगापूर घरणातुन पाणी उचलण्यासाठी परवानगी घेतलेली आहे. प्रशासकीय व औद्योगिक उद्देशासाठी आवश्यक असणारं मनुष्यबळ हे ७० नग प्रति शिफ्ट असेल व कामगारांची नेमणुक प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर करण्यात येईल. एक ६३५ के.व्ही.ए. व दुसरा ७५० के.व्ही.ए. क्षमतेचा असे २ डी.जी. सेट बसविण्यात येतील व ते काही तांत्रिक समस्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला तेव्हा वापरण्यात येतील. प्रस्तावित प्रकल्पाची एकुण किंमत ही रु.२४७.४० कोटी आहे, त्यापैकी रु. ८१.६ कोटी हे पर्यावरण व्यवस्थापनासाठी व रु. २.४७४ कोटी हे सीईआर कार्यक्रमासाठी राखुन ठेवले आहेत. प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, अक्षांक्ष - १८° २६' ३२.०८" उत्तर, रेखांश - ७६° ३७' ४३.५२" पूर्व आणि समुद्र सपाटीपासूनची उंची ६०५ मी. असे आहे. कारखान्याकडे एकूण २३०६७१ चौ.मी. जागा आहे, त्यमध्ये बांधकाम क्षेत्र - १०९२ चौ.मी., युटीलीटी क्षेत्र - १५२५६ चौ.मी. साठवणुकीचे क्षेत्र - ६१८३५ चौ.मी., रस्त्याचे क्षेत्र - २३४७१ चौ.मी., पार्किग क्षेत्र - ४०४ चौ.मी. आणि हरित पट्टा विकास ७६१२१ चौ.मी. इ. समाविष्ट आहे. कारखान्याकडे वाहतुकीसाठी पुरेशी जागा आहे आणि आवश्यक असणाऱ्या सर्व मुलभूत सुविधा कारखाना उपलब्ध करुन देईल.

त्यांनी पुढे सदर भागातील पर्यावरण विषयक अभ्यासाबद्दल विषद केले आणि सांगितले की त्यांनी प्रकल्पस्थळाच्या १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रात विविध घटक जसे, वायु ध्वनी, भूजल, भूपृष्टजल, माती, इ. बाबतचा पर्यावरण विषयक अभ्यास केला आणि खालील प्रमाणे आढळुन आले :-

**वायु पर्यावरण:-** त्यांनी अभ्यास क्षेत्रात ९ ठिकाणी वातावरणातील हवेचे गुणवत्तेचे परिक्षण केले आणि विविध घटकांचे जे प्रमाण आढळुन आले होते ते असे, लातूर येथे $PM_{10}$ - ७३.२४ $\mu g/m^3$ (कमाल) ममदापूर येथे ३८.० $\mu g/m^3$ (किमान) लातूर येथे $PM_{2.5}$ - ३६.० $\mu g/m^3$ (कमाल) सारोळा येथे ९.५५ $\mu g/m^3$ (किमान) लातूर येथे $SO_2$ - ११.४१ $\mu g/m^3$ (कमाल), ममदापूर येथे ४.०१ $\mu g/m^3$ (किमान), लातूर येथे CO - १.६५ $\mu g/m^3$ (कमाल), हारवडी येथे ०.१९ $\mu g/m^3$ (किमान) त्यांनी सांगितले की वायु प्रदूषके व त्यांचा प्रभाव यांचे मुल्यांकन करण्यासाठी त्यांनी केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सूचविलेल्या मॅथमॅटीकल मॉडेलच्या सहाय्याने अभ्यास केला. वायु प्रदूषणाचा प्रभाव कमी करण्यासाठी शमण उपाय सुचविले ते असे आहेत, कच्चा माल व तयार उत्पादनांची वाहतूक करणाच्या वाहनांसाठी PUC प्रमाणपत्र आवश्यक आहे, धुळीचे उत्सर्जन कमी करण्यासाठी सदर रस्त्यावर पाणी फवारणी करणे, बांधकाम टप्यामध्ये बांधकाम साहीत्याची वाहतुक आच्छादीत ट्रक/वाहनातुन करणे, वायु प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी इ.एस.पी. प्रस्तावित केलेल्या आहे व विद्यमान बॉयलरला ७५ मी. उंचीची चिमणी बसविलेली आहे आणि प्रस्तावित बॉयलरला बसविण्यात येणाऱ्या चिमणीची उंची ७० मी. असेल.

**ध्वनी पर्यावरण:-** त्यांनी वेगवेगळ्या ९ ठिकाणी ध्वनी पातळीचे मोजमापन केले आणि ध्वनी पातळी आढळुन आली ती अशी दिवसाच्या वेळी प्रकल्प स्थळ आणि मुहम्मदपूर येथे अनुक्रमे ५२.६ डेसिबल व ४२.३ डेसिबल आणि रात्रीच्या वेळी चिकलठाणा येथे ५१.८ डेसिबल व प्रकल्प स्थळी ४१.३ डेसिबल, जी

केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मानंकाच्या आत आहे. त्यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पामध्ये ध्वनी चे मुख्य स्त्रोतामध्ये पंप, कॉम्प्रेसर, इटीपी मधील मशिनरी व डी.जी. सेट यांचा समावेश आहे. त्यासाठी ध्वनी रोधक बसविले जातील व कामगारांना वयक्तीक संरक्षण साधणे, (पीपीई) उपलब्ध करुण देण्यात येईल.

**<u>जल पर्यावरण:-</u>** त्यांनी सांगितले की मांजरा नदी, जीला मंजिराही असे देखील म्हणतात, जी गोदावरी नदीची उपनदी आहे व ती अभ्यास क्षेत्रात येते, प्रस्तावित प्रकल्पसाठी भु-जलाचा वापर करण्यात येणार नाही कारण आधी सांगितल्या प्रमाणे संपूर्ण पाण्याची मागणी ही खूलगापूर धरणातुन पूर्ण होईल. त्यांनी सांगितले की अभ्यासा दरम्यान भूजलाचे नमुने ९ ठिकाणाहुन संकलित करण्यात आले होते. भू जलातील पाण्याच्या नमुण्याचा सामु ६.७८ ते ७.१६ असा आढळुन आला होता व पाण्याच्या सर्व नमुण्यांमध्ये अन्य घटक हे सीपीसीबी/एमओइएफसीसी यांनी निर्धारित केलेल्या मानकांच्या आत आढळुन आले आणि IS १०५०० २०१२ नुसार भूजलाची गुणवत्ता हि पिण्याच्या उद्देशासाठी उपयुक्त आहे. भू जलाच्या बाबतीत प्रभाव कमी करण्यासाठी कारखान्यातुन निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी औद्यागिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात येईल आणि प्रकियेनंतर ते कारखना परिसरात बागेसाठी वापरण्यात येईल. आसवणी मधून निघणारा स्पेंट वॉश वर MEE मध्ये Treatment करून पुढे ते बॉयलरमध्ये इंधन म्हणून वापरण्यात येईल आणि परिसराच्या बाहेर कोणतेही सांडपाणी सोडले जाणार नाही याची काळजी घेतली जाईल. प्रस्तावित प्रकल्पामध्ये साखर, सहवीज प्रकल्प आणि आसवणी या मधुन निघणारे सांडपाणी व घरगुती सांडपाणी यासाठी वेगवेगळी प्रक्रिया सुविधा उभारल्या जाईल. त्यांनी साखर, सहवीज प्रकल्प, आसवणी प्रकल्प व कंडेंसेट पॉलिशींग युनीट यातील पाणी व सांडपाणी व्यवस्थापन या बाबतीतील तक्त्यांचे छायाचित्रे दाखविली.

**<u>भूगर्भ:-</u>** अभ्यासादरम्यान सदर भागात डेक्कन ट्रॅपशी संबंधीत बेसाल्टीक लावा प्रवाह आढळुन आला व तो भूप्रष्टाला समांतर वाहतो. भूकंप प्रवण क्षेत्र अभ्यासानुसार सदर अभ्यास क्षेत्र हे झोन IV मध्ये येते, जेथे भूकंपाची शक्यता असू शकते.

**<u>माती:-</u>** त्यांनी अभ्यास क्षेत्रातील ९ ठिकाणचे मातीचे नमुने संकलीत केले आणि असे आढळुन आले की सदर भगातील माती काळ्या रंगाची कापूस माती आहे, सदर मातीची सच्छिद्रता ही ४० ते ५०% च्या दरम्यान आढळुन आली होती. मातीच्या नमुन्याच्या विश्लेषणावरुन असे आढळुन आले की सदर माती ही सांडपाण्यामुळे किंवा घातक/घनकऱ्यामुळे प्रदूषित नाही.

**<u>जमिनीचा वापर:-</u>** त्यांनी सांगितले की, अभ्यास क्षेत्रामध्ये त्यांनी NRSC पासुन मिळालेल्या उपग्रह प्रतिमेच्या सहाय्याने जमिनीचा सर्वे केला आणि जमिन वापराचे वर्गीकरण जे आढळुन आले ते असे – बांधकाम क्षेत्र - ११.९१%, लागवडी खालील क्षेत्र – ५१.७०%, पडीक जमिन – ३५.०४%, पानवठे – ०.२७% आणि नद्या - १.०९ %.

**<u>सामाजिक - आर्थिक अभ्यास:-</u>** त्यांनी सांगितले की अभ्यास क्षेत्रा मध्ये त्यांनी १४ गावांचा सामाजिक सर्वे केला आणि भारत सरकाच्या जनगणना २०११ नुसार अतिरिक्त माहिती मिळवीली. विद्यमान तसेच प्रस्तावित प्रकल्पांच्या वेगवेळ्या उपक्रमांमुळे सामाजिक – आर्थिक घटकांवर वेगवेगळा परिणाम होईल. सामाजिक-आर्थिक घटकांमधील ज्या मुख्य घटकांवर परिणाम होईल ते असे आहेत लोकसंख्या, शिक्षण, रोजगार निर्मिती, मुलभूत सुविधा, स्वच्छता/सार्वजनिक आरोग्य आणि कृषि उद्योग. सामाजिक - आर्थिक घटकांसाठी काही उपययोजना प्रस्तावित केलेल्या आहेत, जसे रस्त्यांचे बांधकाम व त्यांची देखरेख ही प्रकल्प

प्रवर्तकांकडून नियमीतपणे केल्या जाईल, मृदा व पाण्याचे संवर्धन तसेच भूजलाचे पुनर्भरण करुन जल स्त्रोतांचा विकास केल्या जाईल. १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रातील काही गावांना कृषि तंत्रज्ञान प्रदान करुन सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्या जाईल, साखर कारखाण्यात प्रदूषण नियंत्रण प्रणाली बसविल्या जाईल आणि जवळपासच्या गावांवर काही परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जाईल व पर्यावरण विषयक सर्व कायद्यांचे काळजीपूर्वक अंमलबजावणी केली जाईल साखर आणि आसवणी प्रकल्प स्थापन्याच्या कारणामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीमुळे स्थानिक लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम होईल आणि स्थानिक तरुणांना प्राधान्य देण्यात येईल. उत्पादन निर्यतामुळे विदेशी चलन निर्माण होईल आणि म्हणून एकंदरीत प्रस्तावित प्रकल्पामुळे सामाजिक घटकांवर सकारात्क परिणाम होईल. त्यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या ऑफीस मेमोरंडम नुसार कारखान्याने कार्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) अंतर्गत रु. २.४७४ कोटींची तरतुद केलेली आहे आणि ते खर्च करण्यासाठी जाहीर लोकसुनावाणीतील मुद्दे मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे अभिप्राय समाविष्ट करुन योजना तयार केली जाईल.

पर्यावरण देखरेखीचा कार्यक्रम विषद करतांना **श्री. कवाडकर** यांनी सांगितले की सदर प्रकल्पाच्या बांधकाम टप्पा तसेच परीचलन टप्यादरम्यान पर्यावरणीय सर्व घटकांची देखरेख केली जाईल. वायु प्रदूषणासाठी परिचलन टप्यामध्ये $PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$ आणि $NOx$ चे परिक्षण केली जाईल, सभोवतालच्या परिसरातील पाण्याची गुणवत्ता, चिमणीतील उत्सर्जन व ध्वनी पातळी दर ३ महिन्यांनी तपासणी केल्या जाईल, मातीच्या गुवत्तेसाठी मातीचे नमुने वर्षातुन एकदा घेतले जाईल, घनकचऱ्याचे विश्लेषण दररोज केले जाईल, सर्व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी नेमणुकीच्या वेळी तसेच नुमणुकीनंतर नियमीत केली जाईल, कोणताही अपघात होऊ नये म्हणून संपूर्ण प्रकल्पाची सुरक्षा तपासणी दर ६ महिन्यांनी केली जाईल, प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे प्रत्यक्ष रोजगार तसेच अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील, साखर व मद्यार्क उत्पादनामुळे राज्याचे महसुली उत्पन्न वाढेल, बाजार आणि व्यवसाय व्यवस्थापनेच्या तसेच सांस्कृतीक आणि मनोरंजनाच्या सुविधा वाढतील.

त्यांनी पुढे पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी विषद केले आणि सांगितले की प्रदूषण नियंत्रणासाठी मे. ट्वेंटी वन शुगर्स लि. तर्फे प्रदूषण नियंत्रण प्रयोगशाळेत वायु, पाणी व इतर मापदंडाचे विश्लेषण केले जाईल, प्रकल्प क्षेत्राच्या आत व बाहेर स्वच्छ पर्यावरणीय परिस्थिती राखण्यासाठी कारखान्यातर्फे पर्यावरण सेल तयार केला जाईल, या व्यतीरीतक्त पर्यावरण परिक्षणाचे काम एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेला दिले जाईल. त्यांनी सांगितले की पर्यावरण व्यवस्थापन योजनेचा आवर्ती खर्च हा वार्षिक रु. ८१६/- लाख अपेक्षित आहे आणि प्रदूषण नियंत्रण उपकरणांची भांडवली गुंतवणूक ही रु. ८१६०/- लाख आहे.

त्यांनी सांगितले की, अभ्यासानंतर असे निदर्शनास आले की मे. ट्वेंटी वन शुगर्स लि.च्या प्रस्तावित प्रकल्पामुळे सभोवतालच्या परिसरावर अनपेक्षित परिणाम होणार नाही, सदर प्रकल्पामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल आणि पर्यावरणीय घटकाचे मुल्यमापन केले आहे व आवश्यक त्या उपाययोजना योजल्या आहेत. या वरुन, त्यांनी सांगितले की पर्यावरण मुल्यांकनामध्ये रचानात्मक टिपानुसार मे. एसडी इंजिनियरिंग सर्विसेस प्रा.लि. यांनी असा निष्कर्ष काढले की सदर प्रकल्पाच्या बांधकाम टप्पा आणि परिचलन टप्पा दरम्यान कोणताही नकारात्क परिणाम होणार नाही याची मे. ट्वेंटी वन शुगर्स लि. तर्फे खात्री करण्यात येईल आणि सकारात्क परिणाम वाढविण्यासाठी काम करण्यात येईल व नंतर त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे

पावर पॉइंट सादरीकरण समाप्त केले. त्यांनतर त्यांनी उपस्थितांना विनंती केली की सदर प्रकल्पा विषयी जर कुणाला काही शंका, वैगेरे असतील तर ते व्यक्त करु शकातात.

जाहीर लोकसुनावणी दरम्यान समिती सदस्य आणि सार्वजनिक सहभागी यांनी त्यांचे मत व सुचना व्यक्त केल्या, त्या खालील प्रमाणे आहेत.

(१) **श्री. जी. श्रीकांत,** जिल्हाधिकारी, लातूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सांगितले की, भारत सरकारने सुचविल्या प्रमाणे एखादा मोठा कारखाना स्थापित करण्यापूर्वी अशा कारखान्यामुळे होणारे फायदे व तोटे जाणुन घेण्यासाठी पर्यावरण मुल्यांकन अभ्यास करुन जाहीर लोक सुनावणी आयोजित केली जाते आणि आतापर्यंत फक्त दोन सुचना प्राप्त झालेल्या आहेत व कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही, डेली लोकमत टाईम्स (इंग्रजी) आणि दैनिक सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रांत जाहीरात प्रसिध्य करण्यात आली होती, जेणे करुन लोकांना जाहीर लोकसुनावणी बाबत माहिती व्हावे आणि त्या अनुषंगाने लोक इथे उपस्थित आहेत. त्यांनी सांगितले की अशा कारखान्याशी संबंधीत सर्व पैलू जसे जल प्रदूषण, वायु प्रदूषण, भूगर्भातील प्रदूषण आणि अन्य प्रदूषण, इ. चा अभ्यास करुन जे सादरीकरण केले कारण सदर प्रकल्पा विषयी जर उपस्थितांनी त्यांचे काही आक्षेप किंवा तक्रारी असतील तर ते त्यांनी व्यक्त करायला पाहीजे आणि शासनाला अहवाल सादर केल्यानंतर सदर प्रकल्पाची उभारणी पूर्ण होईल व त्याची पुढील वाटचाल सुरु होईल.

त्यांनी सांगितले की विशेषत: माराठवाडा विभाग व मराठवाडा विभागात लातूर जिल्हा हा आधिच फार मागासलेला भाग आहे आणि अशा भागामध्ये एक कारखाना स्थापन होतो आणि त्या अनुषंगाने रोजगार निर्मीती व सदर भागाचा सर्वांगिण विकास हे एक महत्वाचे पाऊल आहे. परंतु अशा महत्वाच्या पावलामध्ये पर्यावरण हे देखील फार महत्वाचे आहे, म्हणून त्यांनी प्रकल्प सल्लागार ज्यांनी संपूर्ण अभ्यास करुन सादरीकरण केले त्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की कारखान्याने कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (CER) अंतर्गत विविध उपक्रमांसाठी साधारणत: रु. २.५ कोटी राखून ठेवलेले आहे, हैद्राबाद येथून सुचना प्राप्त झाल्या आहेत, परंतु सदर भागातील नागरीकांकडून नाही आणि म्हणून त्यांनी उपस्थितांनी विचारले की त्यांना काही सुचना नाहीत काय ? नंतर त्यांनी **श्री. एच. मधुबाबु** आणि **श्री. सुनंदा रेड्डी,** पर्यावरणवादी, हैद्राबाद यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना वाचून दाखविल्या आणि सांगितले की दोन्हीही सुचना बहुदा सारख्याच आहेत, त्या अशा - १० कि.मी. त्रिजेच्या क्षेत्रातील खेड्यातील लोकांची आरोग्याविषयक माहिती तयार करणे, पिक उत्पादनाचा तपशिल तयार करणे, नदीतुन पाणी घेण्याऐवजी कारखाना परिसरात रेन वाटर हार्वेस्टिंग प्रणाली बसविणे, इटीपी मधून प्रक्रिया केलेले सांडपाणी वृक्षारोपण व धुळीचे उत्सर्जन होऊ नये म्हणून रस्त्यावर फवारणी साठी वापरणे, ३३ % वृक्षारोपण चांगले आहे, परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजुला झाडे लावणे, इयत्ता १० उत्तीर्णे स्थानिक विद्यार्थांना कारखान्यात रोजगार मिळण्याच्या उर्देशाने कौशल्य शिक्षण देणे, जवळपासच्या गावामध्ये दरवर्षी वैद्यकीय कॅम्प आयोजीत करणे, सदर भागात पिण्याच्या पाण्याची सुवीधा पुरविणे, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर नफ्याची रक्कम सदर भागामध्ये विशेषत: शिक्षणासाठी वापरावी, सदर भागातील रस्त्ये खराब होऊ नये म्हणून काळजी घेण्यात यावी आणि समन्वय समिती स्थापन करणे व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन सीएसआर खाली कामे करणे, इ. त्यांनी सांगितले की **श्री. एच.मधुबाबू** यांनी मागासलेल्या भागात कारखाना स्थापन होत आहे त्याकरीता शुभेच्छा व पाठिंबा दिला.

**श्री. जी. श्रीकांत,** जिल्हाधिकारी, लातूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी उपस्थितांना विनंती केली की ज्यांना कुणाला काही सुचना करावयाच्या असतील तर त्या त्यांनी व्यक्त कराव्यात. तद्‌नंतर जेथे ठिबक सिंचन आहे तेथे शक्यतो उसाला प्राधान्य द्यावे असे त्यांनी सुचित केले कारण भारत सरकारच्या "More Crop Per Drop" व "शाश्वत शेती अभियान" अशा योजना आहेत. त्या अनुषंगाने ठिबक सिंचानासाठी मोठया प्रमाणावर सबसिडी सुध्दा दिली जाते. जे लोक उसाचे पिक घेतात ते ठिबक सिंचनाकडे वळायला पाहीजे त्यामुळे उसाचे उत्पादन वाढेल, पाण्याचा वापर कमी होईल आणि एखाद्या वर्षी कमी पाउस असेल तर अन्य पिके देखील घेतले जाऊ शकेल. त्यांनी पुढे सांगितले की सदर कारखान्यामध्ये भविष्यात जर इथेनॉल, वैगेरेचे उत्पादन होत असेल, कारण त्यांच्या अडीच वर्षांच्या अनुभवातुन असे आढळुन आले की सदर भागामध्ये एक किवां दोन वर्ष हे दुष्काळाचे असतात, त्यामुळे सदर भाग हा ॲशुअर्ड झोन मध्ये नाही, परंतु या भागात कोणतेही मोठे धरण नाही, आणि म्हणून, जर पाऊन कमी असेल तर लोकांनी उसा व्यतीरिक्त सक्तीने इतर पिकांकडे वळायला पाहीजे, कारण उसाची लागवड नसल्यामुळे बरेचसे साखर कारखाने बंद पडतात असा अनुभव आलेला आहे, उसाची उपलब्धता नसल्याकारणाने या वर्षी देखील काही कारखाने बंद पडतील, म्हणून त्यांनी सूचविले की सदर प्रकल्पामध्ये उसाऐवजी अन्य पीक किंवा कृषी आधारीत उद्योग समाविष्ट करता येऊ शकतो काय आणि असे कृषी आधारीत पिक वापरुन इथनॉलच्या ऐवजी इतर उत्पादन घेता येईल काय असे पहावे कारण हळु हळु आपण पर्यावरण पुरक बाबींकडे जात आहोत, अगदी इंधन सुध्दा, कारण वर्तमान पत्रामध्ये नेहमी असे दिसते की साखरेची मागणी पुर्ण होत नाही; म्हणून पारंपारीक पध्दत थांबवायला पाहीजे आणि अपारंपारिकपणे विचार करायला हवा आणि कारखाना व्यवस्थापनाने देखील असा विचार करावा की सदर प्रकल्पामध्ये साखरेएवजी इतर उत्पादने उत्पादीत केले जाऊ शकतील काय आणि उसा ऐवजी इतर पिकांपासून साखर उत्पादीत करता येऊ शकेल काय किंवा कसे ? ही त्यांची विनंती असेल असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुढे असे सूचविले की ठिबक सिंचनास प्राधान्य देणे, मोठ्या रचेनेचे/स्वरुपाचे रेन वॉटर हार्वेस्टिंग स्थापन करणे, जेणे करुन पावसाचे संपूर्ण पाणी स्थानिक पातळीतवर उपलब्ध होऊ शकेल, इटीपी मध्ये प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करणे कारण पाण्याच्या बाबतीत विविध तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्यांनी सांगितले की साखर कारखाना ३६५ दिवस चालणार नाही परंतु जर तो ३६५ दिवस चालला तर आनंदच आहे, कारण तांत्रिक/अतांत्रिक मजुर, तंत्रज्ञ, वाहतुकदार, उसतोड कामगार, वैगेरे अशा हजारो लोकांना सदर कारखान्यात रोजागार मिळेल आणि सदर भागामध्ये मनोरंजन सुविधा व खेळाचे मैदान पुरविणे आवश्यक आहे, म्हणून कारखाना व्यवस्थापनाने या बाबी विचारात घ्याव्यात असा त्यांनी आग्रह केला. त्यांनी पुन्हा उपस्थितांना विनंती केली की जर कुणाच्या काही सुचना असतील तर त्या त्यांनी व्यक्त कराव्यात.

(२) **श्री. राजकुमार आबासाहेब पाटील,** जवळचे गांव मौ. मळवटी, ता. व जि. लातुर यांनी सांगिले की, मे. ट्वेंटी वन शुगर्स लि. सारखा प्रकल्प सदर भागात उभारल्या जात आहे त्यामुळे सदर भागात सुर्वण काळ निश्चित येईल, तो सदर भागातील शेतकरी आणि लोकांच्या जीवनात संमृध्दी आणील. त्यांनी सांगितले की कारखाण्यामुळे पर्यावणाचा विषय जुनाच आहे कारण सदर भागात ३ – ४ कारखाने चालतात, परंतु मुंबई पुणे येथे जी भुमीगत विद्युत लाईन पुरविलेली आहे त्या धर्तीवर सह-वीज प्रकल्पासुन भुमीगत विद्युत लाईन पुरविता येऊ शकते काय या साठी प्रयत्न करायला पाहीजे असे त्यांनी सुचविले. त्यांनी सांगितले की सदर भागामध्ये एक ३३ के.व्ही.ए. चे उप-केंद्र स्थापन झालेले आहे, जे विद्युत जंगलासारखे दिसते, म्हणून प्रस्तावित

प्रकल्पाच्या सहविज निर्मिती प्रकल्पापासून भूमीगत विद्युत लाईन टाकली तर शेतकरी, वैगेरेंना काही त्रास होणार नाही, असे त्यांनी सुचविले, त्यांवर जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी सांगितले की **श्री. पाटील** यांनी केलेल्या सुचनेची नोंद घेतल्या जाईल. **श्री. कवाडकर** यांनी सांगितले की प्रस्तावित सह-विज निर्मीती प्रकल्पातील जास्तीत जास्त वीज ही प्रकल्पाच्या स्वत:च्या वापरासाठी घेतली जाईल आणि उर्वरित वीजेसाठी **श्री. पाटील** यांनी केलेली सूचना विचारात घेतली जाईल.

(३) **श्री. अंगद माणिकराव ढगे पाटील,** जवळचे गांव मौ. खुलगापूर, ता. व जि. लातुर येथील रहिवाशी यांनी सांगितले की त्यांना काही खास बोलायचे नाही, परंतु हैद्राबाद येथुन दोन पर्यावरण वादींनी जे काही सुचना पाठविले ते योग्य आहे आणि मा. जिल्हाधिकांरी साहेबांनी मार्गदर्शन केले ते सुध्दा फार मोलाचे आहे, परंतु रामसेतु बांधतांना एका खारीला असे वाटले की त्यामध्ये एक वाळुचा कण टाकुन सहभागी व्हावे, असे त्यांना वाटते. त्यांनी सांगितले की सन १९९९ साली साहेब (स्व. श्री. विलासरावजी देशमुख) जेव्हा मुख्यमंत्री झाले त्यावेळेस खुलागापूर बंधारा/धरण बांधले आणि फक्त खुलागपूरच नाही तर सदर भागातील लोकाचा देखील सदर बंधाऱ्यामुळे फायदा झालेला आहे आणि जिल्हाधिकारी साहेबांनी सांगितल्या प्रमाणे दरवर्षी किंवा दर अडीच वर्षाला त्यांना दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागते. त्यांनी पुढे सांगितले की खुलगापूर बंधाऱ्यांत जेव्हा जेव्हा पाणी येते तेव्हा तेव्हा त्यांना साहेबांचे चित्र दिसते, आणि त्या पाण्यावर सदर कारखाना (मे. ट्वेंटी वन शुगर्स लि.) यांचा सुध्दा काही अधिकार आहे, जो शासनाकडून मिळविलेला आहे. त्यांनी सांगितले की जेव्हा शेतकऱ्याकडे ऊस असेल तेव्हाच फक्त सदर कारखाना चालविला जाईल, परंतु एखाद्या वर्षी जर उसाचे उत्पादन आले नाही तर मग साखर कारखाना, कर्मचारी, शेतकरी, वैगेरे कसे जगतील आणि म्हणून साहेबांनी २००८ साली मे. विकास को-ऑपरेटीव्ह ॲग्रो इंडस्ट्रिजची स्थापना केली व त्यामध्ये मका आणि अन्य पिकांवर प्रक्रिया करुन शेतकऱ्यांना फायदा मिळावा असा उद्देश होता. त्यांनी पुढे सांगितले की ते ग्रामीण भागातील एक फार सामान्य शेतकरी आहेत आणि आता सद्या **मा. अमित भय्या देशमुख** साहेबांनी त्यांना मे. विकास को-ऑपरेटीव्ह ॲग्रो इंडस्ट्रिजच्या अध्यक्षपदी नेमणूक केलेली आहे. त्यांनी सांगितले की ते सर्वांच एक सेवक आहेत, आणि सातत्याने सेवा करत आहेत, (१९७२ पासून ते आजपर्यत साहेबांनी सहकार क्षेत्रात जे काही युनिट स्थापन केले अशा युनिटचे अधिकारी, शेतकरी प्रदूषण, उत्पादन, वैगेरे बाबत जाणतात) १० कि.मी. पर्यंत प्रदूषणाच्या परिणामा विषयी आधि सांगितल्या प्रमाणे, त्यांनी सांगितले की लातूर महानगरपालिकेचे घरगुती सांडपाणी सर्व प्रथम खुलागपूरला येते जे प्रदूषित झालेले असते, म्हणून सदर सांडपाणी जे नदीत सोडले जाते ते लातूर महानगरपालिकेने प्रक्रिया करायला पाहीजे असे त्यांनी सुचविले कारण ती प्राण्यांची, मानवजातीची तसेच पक्ष्यांची गरज आहे, परंतु आज ती गरज भागत नाही. त्यांनी असे सुध्दा सांगितले की प्रत्येक वर्षी नैसर्गिक पाणी येते, ते उपयुक्त आहे, जे कारखान्याने तसेच शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पादन वाढीसाठी वापरायला पाहीजे व कारखान्याचा अधिकार देखील खंडीत झाला नाही पाहीजे. त्यांनी पुढे सांगिले की मे. ट्वेटी वन शुगरचे युनिट हे सदर भागातील सर्वांच्या कल्याणासाठी आहे, हैद्राबाद येथुन प्राप्त झालेल्या सुचना नुसार उपक्रम राबविले/राबविल्या जात आहेत. लातूर महानगरपालिकेकडून येत असलेल्या सांडपाण्याचे शुध्दीकरण झाले पाहीजे असे त्यांनी सुचविले आणि सदर भागातील सर्वांचे जीवन हे सुजलाम सुफलाम व्हायला पाहीजे अशी आशा त्यांनी व्यक्त केली. **श्री. जी. श्रीकांत**, जिल्हाधिकारी, लातूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सांगितले की, **श्री. ढगे पाटील** यांनी मे. विकास को ऑपरेटीव्ह इंडस्ट्रिजच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला तो अत्यंत

महत्वाचा आहे परंतु तो विषयाच्या बाहेरचा आहे, तथापि, जिल्हाधिकारी या नात्याने त्यांनी उत्तर दिले की लातूर महानगरपालिकेचे खुलागापूर धरणात जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्या बाबत आधिच तक्रार होती आणि त्या वेळेला त्यांनी स्वत: म.प्र.नि.मंडळाचे **श्री. शेळके** यांच्या सोबत बैठक घेऊन सदर मुद्याविषयी शासनास विनंती केली होती आणि त्या नंतर महानगरपालिकेला रु. १४०/- कोटींचा निधी प्राप्त झाला होता, आणि जेव्हा ते सहा महिन्याच्या कालावधीसाठी लातूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून होते, परंत अन्य कारणास्तव पुढील प्रक्रिया थांबली आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की लातूर जिल्हामध्ये पहील्यांदा 'पाणी परिषद' आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये सदर मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चीला गेला होता, खुलागापूर आणि आजूबाजूच्या परिसरातील पाणी पिले जाऊ शकत नाही. कारण ते महानगरपालिकेच्या सांडपाण्यामुळे प्रदूषित होते आणि त्या अनुषंगाने त्यांनी महानगपालिकेला सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा (STP) उभारण्यासाठी मौ. भोरवटी येथे आधिच चार ते सहा एकर जागा दिलेली आहे, परंतु पुढील प्रक्रिया का थांबली हे माहित नाही. त्यांनी असे सुध्दा निदर्शनास आणून दिले की अलिकडे परवाच्या दिवशी श्री. शेळके यांनी लातूर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर आणि विधानसभेचे मा. आमदार यांना सदर प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती कली आणि अशी खात्री वाटते की एक ते दीड वर्षामध्ये लोकांना खुलगापुर धरणामध्ये शुध्द केलेले पाणी मिळेल व ते शेतीसाठी सहज वापरता येइल. त्यांनी सांगितले की खुलागपूरला कधीच पाणी मिळणार नाही की काय अशी त्यांना भिती वाटत होती कारण महानगरपालिका साधारणत: ४ कोटी लिटर पाणी बाहेरच्या भागात सोडते, म्हणजेच काही प्रमणात दक्षिण भागात व काही प्रमाणात उत्तर भागात, परंतु प्रक्रियेनंतर जवळपास १.५ ते २.० कोटी लिटर प्रक्रिया केलेले पाणी सदर भागातील लोकांना मिळु शकेल आणि पुष्कळसे शेतकरी जसे भाजीपाला, वैगेरे करणारे महानगरपालिकेच्या पाण्यावर जगातात म्हणून त्यांनी सांगितले की कारखाण्याने महानगरपालिकेचे प्रक्रिया केलेले पाणी वापरासाठी ते आग्रही असतील व ते पाणी सदर भागातील सर्वांची मागणी पूर्ण करेल. त्यांनी नागपूर महानगरपालिकेचे उदाहरण दिले की जे सांडपाण्यावर प्रक्रिया केल्या नंतर ते कोराडी थर्मल पावर स्टेशन विज निर्मीतीसाठी देऊन करोडो रुपये मिळवतात, त्याप्रामणे लातूर महानगरपालिकेने सांडपाण्यावर प्रक्रिया करुन जो कारखाना अशा प्रकारचे पाणी वापरु शकते त्या बरोबर करार करु शकते. त्या अनुषंगाने त्यांनी सांगितल की नविन तंत्रज्ञान उपलब्ध आहेत, (कारखाना बंद व्हायला नाही पाहीजे व तो उसाऐवजी अन्य पिकाचा वापर करुन एकुण ३६५ दिवसा चालला पाहीजे, कारण बहुतेक कृषि उत्पादनामध्ये साखर असते) त्यांनी सांगितले की योगायोगाने आज चांगला दिवस आहे आणि सदर प्रकल्पाचे नाव मे. ट्वेटी वन शुगर्स लि. आहे आणि त्या अनुषंगाने कृषि पिकांचा कसा वापर करावा हे सदर प्रकल्पाचे व्यवस्थापकिय संचालक, वैगेरे यांनी विचार करावा असे सूचविले. त्यांनी पुढे सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा एक स्वयंपूर्ण कारखाना होत आहे कारण ते त्यांची स्वत:ची वीज त्यांच्या गरजेनुसार वापरतील आणि जर विज एम.एस.इ.डी.सी.एल. ला देण्याची त्यांची ईच्छा असेल तर, तो त्यांचा प्रश्न आहे, परंतु संपूर्ण सिस्टीम जर भुमीगत असेल तर मग कारखान्याला सहवीज निर्मिती प्रकल्पापासून भूमीगत विद्युत लाईन पुरविणे योग्य होईल, अन्यथा ऐकेरी भुमीगत विद्युत लाईन पुरविणे हे कारखान्यास योग्य होणार नाही. त्यांनी सांगितले की हळुहळु कदाचित ५०-६० वर्षात एकही लाईन दिसाणार नाही आणि सगळीकडे भुमीगत विद्युत लाईन असेल. तथापि नविन तंत्रज्ञान उपलब्ध आहेत व सदर बाब ही एमएसइडीसीएल च्या अखत्यारीतील आहे.

४) **श्री. सुनंदा रेड्डी, हैद्राबाद** येथील पर्यावरणवादी, यांनी सांगितले की भारतामध्ये १८ ते ३५ वयोगटातील साधारणत: एक कोटी लोक दरवर्षी बाजारात रोजगारासाठी येतात आणि भारत सरकार व राज्य सरकार फक्त ४ ते ५ लाख लोकांना नोकरी देते आणि उर्वरित ९५ लाख लोक हे खाजगी कारखान्यावर अवलंबून राहतात. त्यांनी सांगितले की सर्व साधारणपणे पर्यावरणवादी हे कारखान्यांना ते वायु प्रदूषण, जल प्रदूषण, इ. कारणास्तव म्हणून त्यांना विरोध करतात, परंतु ते एक व्यवहारीक पर्यावरणवादी आहेत, जे कारखान्यांना प्रोत्साहीत करतात, परंतु त्याच बरोबर बेरोजगारी हे समाजासाठी फार मोठे प्रदूषण आहे. त्यांनी जाहीर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांना विनंती केली की मे. ट्वेटी वन शुगर्स लि. ला विना अट परवानगी देण्याविषयी एमओइएफला शिफारस करावी, त्यावर **श्री. जी. श्रीकांत**, जिल्हाधिकारी, लातूर  तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सांगितले की परवानगी ही विनाअट असु शकत नाही, ते समाजाच्या अडचणी/समस्या समजू शकतात, बेरोजगारी हे देशात सर्वात मोठे प्रदूषण आहे आणि (बेरोजगारी कमी करण्यासाठी अधिक कृषिवर आधारीत कारखाने पाहीजेत आणि सदर कारखाना हा फक्त अधिक कृषिवर आधारित आहे. श्री. रेड्डी यांनी सांगितले की कारखान्याने ७५०० टी.सी.बी. क्षमता प्रस्तावित केलेले आहे, जी तीन ते चार महिने चालेल, म्हणजेच ती प्रति हंगाम ९ लाख टीसीबी पेक्षा जास्त असेल आणि अंदाजे १० हजार एकर हुन अधिक ऊस येईल, प्रति एकर अंदाजे ८० ते ९० टन  देते प्रत्येक एकरला अंदाजे ३ कोटी लिटर पाणी लागेल ते अंदाजे २८५०० कोटी लिटर होते म्हणजेच तात्पुरते १० टीएमसी पाणी लागेल म्हणून त्यांनी प्रशासन आणि कारखाना व्यवस्थापन यांनी शेतकऱ्यांना ठिबक सिंचानासाठी प्रोत्साहीत करावे जेणे करुन ३ ते ४ टी.एम.सी. पाणी वाचेल. **श्री. जी. श्रीकांत,** जिल्हाधिकारी, लातूर  तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सांगितले की त्यांनी त्या बाबत अधिच मराठीमध्ये सांगितलेले आहे. आणि भारत सरकार व महाराष्ट्र सरकार त्यासाठी आधिच ७५ टक्के सबसीडी देत आहेत तसेच ज्या व्यक्ती ठिबक सिंचनाचा वापर करुन उसाची लागवड करते त्यांना प्रोत्साहन देते. श्री. रेड्डी यांनी कारखान्याने ताबडतोब वृक्षारोपणास सुरुवात करावी अशी विनंती केली.

**श्री. जी. श्रीकांत,** जिल्हाधिकारी, लातूर  तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सांगितले की आज मे. ट्वेटी वन शुगर्स लि. च्या बाबतीत जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यात आली. पर्यावरणवादी तसेच स्थानिक लोकांनी ज्या मौल्यवान सुचना केल्या त्यांची अंमलबजावणी केल्या जाईल व कारखान्याचे व्यवस्थापकिय संचालक यांनी त्यांच्या सल्लागारामार्फत त्याआधिच तयार केलेल्या आहेत, कारखान्याने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कारपोरेट पर्यावरण जबाबदारी करीता आधिच रुपये २.५ कोटी राखुन ठेवलेले आहेत, जे सदर भागासाठी अतिशय महत्वाचे आहे कारण ते सदर भागातील मुलांना व शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांना मदतीचे होईल आणि, उसाला जास्त भाव मिळेल, सदर भागातील लोकांच्या मुलांसाठी रोजगार उपलब्ध होईल आणि या सगळ्या प्रकियेमध्ये कारखान्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्ध आहे, नवनवीन तंत्रज्ञानाविषयी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे कारखान्यास वेळोवेळी तांत्रिक सल्ला देखील मिळत आहे. त्यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पा बाबत पर्यावरणाला कोणतीही बाधा न येउ देता  सल्लागारांनी वायु प्रदूषण, जल प्रदूषण, इ. विषयी तयार केलेला मसुदा ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केले व ज्या काही सुचना केल्या आहेत त्या अधिच समाविष्ट केल्या आहेत आणि म्हणून त्यांनी सांगितले की मे. ट्वेटी वन शुगर्स लि.च्या पुढील वाटचालीसाठी त्यांनी हार्दिक

शुभेच्छा दिल्या व पर्यावरण राखुन कारखाना त्यांचा प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करतील अशी आशा व्यक्त केली आणि नंतर त्यांनी उपस्थितांचे आभार मानुन मे. ट्वेटी वन शुगर्स लि. च्या प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समाप्त केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(राजेंद्र राजपूत)
सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी
तथा
प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद

(जी.श्रीकांत)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी
तथा
जिल्हाधिकारी, लातूर.

(व्यं.पां.शेळके)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी
तथा
उप- प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, लातूर.